म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. ९५९३
सन १९६६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाम
अनुक्रम ५९५८८ वि: काव्य
क्र. ९५९३ नों. दि. २२.६

# मावळतीची कडा

[ कै. केशवसुतांच्या कवितेचें भाव-दर्शन ]

: कल्पक :

प्रफुल्लदत्त

REFBK-0015552
REFBK-0015552

# मावळतीची कडा

[ कै. केशवसुतांच्यां कवितेचें भाव-दर्शन ]

१५५५२

किंमत पन्नास पैसे

: कल्पक :

प्रफुल्लदत्त

REFBK-0015552
REFBK-0015552

प्रकाशक :
द. वि. तेंडुलकर
एम्. ए., बी. टी.
रुक्मिणी स्मरण १२२
माटुंगा–मुंबई. १९

ह्या 'भाव–दर्शनां'चा कोणत्याही तऱ्हेचा उपयोग करण्यापूर्वी वरील पत्त्यावर चौकशी करावी

मुद्रक :
विवेक मुद्रणालय
प्रभादेवी–मुंबई २८.

केशवसुतांची कविता दोन तपाहून अधिक काळ माझ्या वाचनांत आहे. पहिली काही वर्षें अध्ययन म्हणून आणि नंतर अध्यापन म्हणून. आजच्या कवितेचे स्वरूप पहाणाऱ्या अभ्यासूंना 'केशवसुतांनी' आधुनिक कवितेला नवे वळण लावले हे सांगावयास नको. त्यांनी भाषांतराचा पांगुळगाडा टाकून दिला.

प्रस्तुत भाव–दर्शनांत माझी प्रतिभा त्यांच्या चरणीं विलीन होऊन गात आहे. त्यांच्या विविध विषयांतील आशयाशी एकरुप होताना मी माझ्या कल्पकतेचा उपयोग केला आहे. ह्या पुस्तिकेंत माझे जे काही आहे ते...'दे टाळी ग...दे टाळी' हे गीत, मावळतीच्या कडा रंगविणारी अकरा भाव–वलयें आणि आरंभीचे व अखेरचे अशी दोन गीतें...एवढेच.

तेव्हां ह्या भाव–दर्शनांत 'कल्पकता माझी गाते' असेच मी म्हणतो.

१५–३–६६
मुंबई १९.

—प्रफुल्लदत्त

# पार्श्वभूमि

महाराष्ट्र-शारदेच्या मंदिरात अढळपद मिळविणाऱ्या केशवसुतांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष. हवेत तरंगणाऱ्या पिसाबरोबर प्रत्यक्षातून परोक्षात जाणाऱ्या ह्या कवीची प्रतिभा परिणतावस्थेत काहीशी गूढ झाली आहे.

जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे
गाणे मनांत मग होय सवेंचि जागे

अशी त्यांची स्वयंभू वृत्ती. पण ' विवंचनेमधि जिणें कंठावे ' लागल्यामुळे त्यांच्या वृत्तीत विमनस्कता आली, चिंतनशीलता आली. आणि म्हणून कल्लोलिनी-सारख्या वेगवती मनोभावनेमुळे त्यांच्या प्रतिभेच्या आविष्कारात उन्मेषाबरोबर उदासीनता आली. अशा 'दिक्कालातून आरपार पाहण्याची शक्ती' असलेल्या ह्या कवि-प्रतिभेचे पदन्यास लक्षात घेण्यासारखे आहेत.

केशवसुतांचा लेखनकाळ अवघा वीस वर्षांचा.. १८८५ ते १९०५ पर्यंतचा. ह्या कालखंडातील कवितांचे मी दोन विभाग कल्पिलेले आहेत. पहिला १८८५ ते १८९३ पर्यंतचा... आठ वर्षांचा. आणि दुसरा १८९३ ते १९०५ पर्यंतचा ... बारा वर्षांचा. प्रतिभेच्या आवर्तनी अवस्थेत

द्या उत्तेजन हो कवीस न करा गाणें तयाचें मुके

असे लिहिणारी त्यांची लेखणी प्रतिभेच्या प्रौढावस्थेत लिहिते—

तुझ्या दिव्यत्वापुढे जग भिकारी-कासया ही खिन्नता.... दूर सारी

काहीही म्हटले तरी केशवसुतांची मनोवृत्ती खिन्न आहे, उदासीन आहे, विमनस्क आहे, उन्मनावस्थेत वेड्याप्रमाणे गाऊन कालक्षेप करणारी आहे. त्यांच्या प्रतिभेचे भव्यत्व मान्य करूनही असे म्हणावेसे वाटते. म्हणूनच हे केशवसुत-दर्शन म्हणजे आपल्या प्रतिभेने जीवनाच्या मावळतीची कडा रंगविणाऱ्या कवि-मनाचा आविष्कार आहे.

## ग्रामदेवतांचे स्वागत-गीत

### रसज्ञांपुढे शब्द-शिल्प हे:

अम्ही ग्रामदेवता प्रकटलो कवि कृष्णा गावया
जन्मशताब्दी आज जयाची, गौरविता तुम्हि जया
काजळल्यावर विश्व, अगोचर आम्ही संचारतो
ग्रामस्थांचे चिंतित हित, नित वैभव संरक्षितो

सहस्राहुनी अधिक आमुचे सुपुत्र ह्या परिसरी
मातृ-मंदिरा उजाळि त्यांत हा नंदादीपापरी
तुम्ही कुणि न पाहिले तया मग सांगु कसा आननी ?
रसज्ञांपुढे शब्द-शिल्प हे करावया छाननी

कुणा कवीने कल्पियला परि त्या प्रतिभेचा छडा
न्याहाळिना तो चला रंगवु मावळतीची कडा

# आवर्तन

दा. क. ९५५५२

–१– प्रसन्न असुनी ही संध्या कवितेविण घटका वंध्या
तिच्यावाचुनी भाव मुका तिच्यावाचुनी जन्म फुका
ये प्रतिभे ! दे साथ कुठेतरि झडतो हा चौघडा
करु मंगलमय घडी, चितारुनि मावळतीची कडा

अलीकडे मी बेचैन आहे. जन्मभूमीच्या आठवणीने. सह्याद्रीच्या पायथ्यालगत असलेले माझे ते रम्य खेडे. तेथील त्या साध्या झोपडया...निसर्गाच्या निरागसतेची रम्य प्रतीके. गाद्या-गिर्द्यांवर लोळणाऱ्या बडयांची तेथे मिजास नाही. तेथील चराचरात देवत्वाची साक्ष पटते.

देवळीं त्या देवास बळे आणा, परी राही तो सृष्टिमधे राणा

त्याच अज्ञात शक्तीच्या प्रेरणेने तेथे...

स्तोत्र ओढे थांबल्याचीण गाती, सूर वारे आपुला नित्य देती

अशा नितान्त रम्य स्थळी मला—

एक गवतारू खोप रहायाते, शेतवाडी एक ती खपायाला

मिळाली तर...! कशाला हवी ती कीर्ती ?

कीर्ती म्हणजे वाऱ्याबरोबर परिसरांत विलीन होणारा शिंगनाद. कीर्ती म्हणजे पांखराच्या कुशीतून गळलेले पीस. प्रसंगी प्राणाची किंमत द्यावी लागते तिच्या प्राप्तीसाठी.

–२– कीर्ति एक ते शिंग असे जीत अहंता झिंग बसे
मुकुटी ज्याच्या मोरपिसे मिरवि जगी तो हवेतसे
विरता क्रांती जाइ कुठेतरि नेतृत्वा त्या तडा
अकालीच काजळे तयाची मावळतीची कडा

'घराकडील गोष्टी' मला अशाच वेळी अवेळी अस्वस्थ करतात. आमच्या ओटीवरील ते घड्याळ. होते तसेच अजूनही आहे....

टकटका करिते घड्याळ. त्या शांततेत गमते कुटिलेच टाळ

मोटी चढून गेले की डाव्या बाजूला माझे परम पूज्य वडील खाटेवर पहुडलेले दिसतील. उजव्या बाजूला बापूचे अंथरूण. त्याच्याविषयी माझ्या मनात आदर आणि अपेक्षा आहेत.

बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?
तूं देशकारण करूं झटशील काय ?

जरा पुढे गेले की माझी आई निजलेली दिसेल. खंगलेली. आणि मागील दारी ती तुळस. आर्यांगनेच्या व्यथित मनाला दिलासा देणारे एक रोपटे.

असा सा......रखा......... ऽऽऽ

—४— गत स्मृतींतुनि फिरतो मी डोळयांपुढल्या शून्य तमी
प्रपंचातले सर्व उणे विसते माझ्या काव्यगुणे
छंदच हा घालितो पथी मम प्राजक्ताचा सडा
उरिची माझ्या व्यथा चितारी मावळतीची कडा

नाही तरी—सुखाहूनी दुःखा स्मरति बहुधा बद्ध हृदये

मीही असाच बद्ध आहे. म्हणून माझे हृदय विद्ध आहे. मलादेखील हे लौकिक जिणे जड वाटते. इथे माणूस माणसाला माणूस मानायला तयार नाही.

नरोचि केला हीन किती नर ?

वर्गात मी नेहमीच मागल्या बाकावर बसत असे. एकदा एका शिक्षकाने मला ' दुर्मुखलेला ' म्हटले.

—४— दुर्मुखला मी असे जरी निरंजनाचा ध्यास उरी
जगावेगळा, असुनि जगी व्यर्थ कुणाजवळि न सलगी
म्हणुनि वाटलो काय तुम्हा मी तांदळातला खडा
खडाच हा उजळील उद्याची मावळतीची कडा...

पाचसात रुपयांच्या तुटपुंज्या पगारावर प्रापंचिक ओझे वाहणाऱ्या बिचाऱ्या शिक्षकाला मी काय म्हणून दोष देऊ, मला दुर्मुखलेला म्हटले म्हणून ! पण मला विश्वास वाटतो की उद्याची रसिकता माझ्या प्रतिभेवर बोलणार आहे. माझ्या काही कवितांवर स्तुतिसुमने उधळणार आहे. शब्द अगदी ओठावर आले होते—

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या चालावयाचा पुढे
आहे सुंदर तो सदा सरस वाङ्निष्यन्द चोहीकडे
तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे घातील तो प्राशुनी
कोणीही पुसणार नाहि कवि तो होता कसा आननी ?

'पण अंतर्मुख व्यक्तीच्या उदासीनतेचे रंगरूप सर्व-सामान्यांना कळत नाही,' हे ध्यानात घेऊन मी माझा आवेग आवरला. मी उदासीन आहे हे खरे; पण दुर्मुखलेला नाही. दुर्मुखलेला ह्या शब्दांत संकुचित अर्थ आहे. स्वार्थ साधता येत नाही ही पोटदुखी आहे. आणि उदासीनतेवर बाहेरून राख दिसली तरी आत अंगारांची धुगधुगी असते. सृष्टिशी समरस होणारा मी असाच जगणार दिङ्मूढ होऊन तिच्याकडे असाच बघणार. मावळतीची कडा चितारीत.

तल्लीन होऊन तिला गाऊ म्हटले तरी—

कसा गाऊ तीच्या पुढती वद मी पामर नर ?

आणि गायिलो तरी विरंगुळा म्हणून ' गाण्याने श्रम वाटतात हलके,' म्हणून. पण—

करूनिया काव्य जनात आणणे, न मुख्य हा हेतु मदीय मी म्हणे

कवि अनिर्बंध असावा. स्वच्छंद असावा. धुंद असावा चराचरातील गंध लुटीत भ्रमणाऱ्या मधुपाची रसिकता जागवीत त्याने जगावे. अनुभूतीत सहृदयता ओतीत पदन्यास टाकणाऱ्या कवीची प्रतिभा चित्त वेधून घेते. म्हणूनच,

अशी असावी कविता फिरून, तशी नसावी कविता म्हणून

कुणी सांगू लागला तर कवीने तिकडे दुर्लक्ष करावे. चांगली कविता हवी असेल तर,

कवीस सोडा कवितेबरोबरी

ही माझ्या ' गावी गेलेल्या मित्राची खोली. ' आम्ही,—

देशाविषयी गोष्टी बोलत येथें—बसलो विसरुनि कितीकदा निद्रेते

ह्या देशाच्या स्वतंत्रतेची—

या डोळ्यांनी पहाट ती बघण्याचे—असेल कां हो नशिबी दुर्दैव्याचें ?

आज मी—

मनी माझ्या व्हावी चलित कविता शक्ति म्हणुनी
कशाला एकाकी फिरत असतो नित्य विपिनी ?

हा भुंग्याचा गुंजारव :

भृंगा आणि तुझें गान–सृष्टीचे गमते कवन
गा ! तूं गा ! नादी भ्रमरा–मी गणमात्रा जुळणारा

प्रीती, चारुता आणि आनंद यांचे रसाळ छंद गुणगुणारा हा स्वैर संचारी जीव. याच्या धुंगीत मला कधी राहता येईल का ? ज्याला ती धुंगी लाभली त्याची प्रतिभा. पण तिचे स्वरूप मीही पाहिले आहे.

एका दुर्गम भूशिरावरि परी देवी कुणी बैसली
होती वस्त्र विणीत अद्भुत असें, ती गात गीतें भली
होते शोधक नेत्र, कर्णहि तिचे ते तीक्ष्ण भारी तसे
होते भाल विशाल देवगुरुनें पूजा करावी असे

ही सृष्टी ! हिच्या हरएक हालचालींत माझी दृष्टी आता दिव्यत्व शोधू लागली आहे.

धोंड्यामधूनीहि दिसे कवीला

हेच ती सिद्ध करते. पहा ! ती पहा !

मूर्ती दिव्य अशी अहा ! उतरली धोंड्यामधूनी भली
माझी दृष्टि असे अलौकिक मला जाणीव ही जाहली

त्या जाणिवेने ' कवि ' मनाला एक प्रकारचा कैफ चढतो.

चाले तो धरणीवरी तर पहा, जेथूनि तो चालिला
धूली तेथिल होतसे कनकिता........

अशा अवस्थेत—

लीलेने स्वकरात तो धरितसे कांडी बरूंची जधी
साऱ्या सुंदर वस्तु त्या झडकरी येती समाधीमधी

कवीची हवी तिथे समाधी लागायला हवी. मनाच्या समाधीशिवाय विश्वाला भावबद्ध करणारे शब्द-शिल्प निर्माण होत नाही.

( शेजारच्या मेजावरील एक पुस्तक उचलून ) हे एका भारतीयाचे उद्‌गार--

देवा, केव्हां परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून

(एक ब्राह्मण अस्पृश्य मुलांच्या अंगावर ओरडतोय)

सरा रे दुरी पोरहो म्हारड्यांचे
चला! खेळ हे मांडले डोंबलाचे

काठी उगारतो. ती पळतात. त्यातील एक तिथेच उभा राहतो.

दुरी गाढवा! सांवली ना पडेल?

तो मुलगा स्वतःशी-

जरी त्यावरी सांवली माझि गेली
तरी काय बाधा असे ठेविलेली?

कवि सचिंत मनस्थितीत-

जायाचें जग का असेंच, सगळे ऐसेच का चालणे?
बा धाव देवा! तर ये त्वरेने, ही दुर्दशा थांबिव रे दयेने

जग हा ईश्वराने लिहिलेला ग्रंथ आहे ना? मग त्यातील प्रकरणा-प्रकरणात इतकी विसंगती का? नाही. आम्हांला त्या कवि-प्रतिभेचे गूढ उकलत नाही.

त्या मोठ्या कविचा अम्ही न झटतो इष्टार्थ जाणावया

नकोसं झालं आहे हे कष्टमय जीवन. वाटतं, 'कशाला या जगात परमेश्वराने आपल्याला पाठविले?'

जगामधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें?

छेः! त्यात काहीतरी हेतू असेल. काही अपेक्षा असेल.

ह्या शाळा, नव्हे, ही विद्यामंदिरे! ह्या मंदिरांत ध्यानस्थ बसणाऱ्या बालमूर्तीतूनच उद्यांचे मुक्तेश्वर साकारणार आहेत. पण आपल्या व्यवसायाचे पावित्र्य ओळखणारे कितीसे गुरू या क्षेत्रात आहेत?

–५– 'उद्धर रथ' वदता पार्थ, 'ऐक' म्हणे हरि 'गीतार्थ'
गुरु-शिष्याची ती वाणी, अजून काळाच्या सरणी
गुरुत्वाविना अढळ राहिना छात्राच्या मनि धडा
अंगारे अपयशे तयाची मावळतीची कडा

परवा एका शिक्षकाने शिष्याला काळानिळा होईपर्यंत मारला. घटकाभर अस्वस्थ झालो मी. लगेच दैनंदिनीत लिहून ठेविले......

कोणें मूर्खपणें गुरुपद तुला ऽ ऽ असे रे दिले ?

मला माहीत आहे की मुलेही त्याच योग्यतेची असतात. त्यांचा वाह्यातपणा कह्यात ठेवण्यासाठी चौदावे रत्न वापरावे लागते. पण इतक्या निष्ठुरतेने ? मुलाच्या बुद्धीतलि उणीव आणि वागणुकीतील व्रात्यपणा दूर करण्यासाठी ही उपाययोजना ? शिकविण्याइतकेच शिक्षेच्या योजनेवर गुरुत्वाकर्षण अवलंबून आहे.

दैनंदिन जीवनात कर्तव्याइतकेच प्रेमालाही महत्त्व आहे. मानवी मनोरथाच्या चक्रातील ते वंगण आहे. ज्याच्या मनोरथाच्या चक्राला त्याचा उपयोग झाला त्याच्या प्रतिभेने पृथ्वीला रंगण घातले.

प्रीति जगाचे वसन विणितसे

पण अशी प्रीती—

प्रीती मिळेल का हो बाजारी ? प्रीती मिळेल का हो शेजारी ?

मग ती कुठे मिळेल ?

प्रीतिचा असा ग....ऽ सौदा, प्रीतिने प्रीति संपादा

प्रीती ही माझे, " अपर कविता दैवत " आहे.

प्रिये माझ्या उच्छृंखल करुनिया वृत्ति सगळ्या
तुझ्या गे भासानें कवन–रचनेला वळविल्या
तुझेवीणें तूझेवर मजासि काव्येंच लिहिणें
उपायाने ऐशा मन विरहतापीं रमविणें

प्रिये !

जरी तूं ह्या येथे असातिस सखे सौख्यद मला

कारण,

लोचनाला या होसि तूं प्रकाश—मदीयात्म्याचा तूंच गे विकास

पण आम्ही कवी आपले प्रेम शब्दरूपाने अमर करू शकतो. प्रियेचे सौंदर्य काळालाही जिंकून उरते.

काळ्या शाईमधें प्रियेस अपुल्या मी कागदी ठेवितो

ही एक बारा–तेरा वर्षांची निद्रामग्न मुलगी. किती मुग्ध मधुर भावनांचा संगम तिच्या मुख–मंडलावर झाला आहे! भूतकाळाचा शोक आणि भविष्यकाळाची चिंता यांचा तिथे मागमूसही नाही.

निद्रामग्न मुली! तुझें मुख अहा हे रम्य आहे किती
तें साधेपण नम्रता मधुरता शांती तिथें शोभती

ही फुले! सारखे पहात रहावेसे वाटते यांच्याकडे. मन नजरबंद होते.

अम्हां भ्रमिष्ट बालकांस काव्य देवतेचिया
जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया

पण हे ' आम्ही कोण?' आम्ही! तुतारीच्या पडसादांतून प्रेते उठविणारे शाहीर. आमच्यापुढे राजराजेश्वरही विनम्र होतात. कवी हा पिढ्यान्‌पिढ्यांना चैतन्य देणारा एक जिवंत झरा आहे. त्याच्या गाण्याने श्रोत्यांचा श्रमपरिहार होतो. दिवसभर श्रम करणाऱ्यांची मावळतीची कडा उजळण्याची किमया कवीच्या वाणीत आहे.

आता सूर्य घारेवर आलेला आहे. हा मजूर घराकडे परतत आहे. दिवसभर उन्हात तापणाऱ्या या भूमिपुत्राची स्थिती पहा! उपासमार होत असावी त्याची.

सर्वत्र ही मौज पहा! दिसे परी—माझ्याच का दुःख भरे बरे उरी?
सर्वांस देवा बघतोसि सारखा! होतोस का रे गरिबास पारखा?

कलावंत जगात असून जगापासून निराळा असतो. राहावेच लागते तसे त्याला. चाकोरीतून जाणाऱ्याचे मन चौखूर दौडू शकत नाही. पण जग समजते तसा तो वेडा नसतो. चिंतनव्यग्र आणि चिंताग्रस्त असल्यामुळे तो तसा वाटतो—व्यवहारशून्य. आणि म्हणून परिसराच्या उपहासाचा तो एक विषय बनून राहतो. त्याच्या कित्येक घटका काळो-

घात विरून जातात असे सर्वसामान्य माणसाला वाटते. पण त्यांच्या वेदनेतून उत्स्फुरलेले चरण वेदवाक्याप्रमाणे पंडितांच्या ओठी अमर होतात. त्यांनी ' फुकट दवडलेला एखादा तास ' काळाच्या बागेंत पाषाणपुष्प म्हणून चिरंजीव होतो. तुकयाच्या समाधीच्या घटका इंद्रायणीने अभंग ठेविल्याच ना ?

कवी ! कवीचे भावनासामर्थ्य लौकिक जगाच्या नजरेत येत नाही. लक्ष्मीच्या पेढीवर नाण्यांच्या तारेत राहणाऱ्या उपयुक्ततावाद्यांना सरस्वतीच्या मंदिरांतील हे वीणा-वादन रुचणार नाही. कवीचे सामर्थ्य—

दृष्टी तो फिरवी वरी, तरि लवे आकाश ते खालती
तारांचे गण गावयास वरुनी स्तोत्रे अहा लागती

ते सामर्थ्य माझ्यांत आता संचारू लागले आहे.

—६—

प्रतिभा माझी काव्यरता — आता पदन्यासात व्यथा
ब्रह्मानंदीचे सुख हे — दिगंतास व्यापुनि राहे
यापुढती होईल कधीहि न — रिता स्फूर्तिचा घडा
मावजले त्या सिंचित — फुलविनें मावळतीची कडा

## उड्डाण

आता फक्त ' थकलेल्या भटकणाऱ्याचें गाणें.' पायात गती आणि हृदयात कविता रती. सृष्टी आणि कवी. ह्या सृष्टीत रंगलेला मीं. माझ्या पाऊलवाटेवरील धूळ देखील उद्या माझ्या पदन्यासाचा अर्थ मागाहून येणाराला समजावून देईल.

मी एकला फिरतसे बहुवार रानीं यालागी न समजा मजला अडाणी

—७— काय जगाची मज ये—जा मी न अता उरलो माझा
असाच लहरत स्वच्छंद लुटितो मी जीवनगंध
रसनेसंगे, नकळत रंगे भावरतीचा विडा
कळे न कधि काजळे आणि मग मावळतीची कडा

ही हिरवी सृष्टी माझी आराध्यदैवत आहे. तिच्या निदिध्यासात मी माझे प्रापंचिक ओझे विसरतो.

प्रत्येक मेघ वरतां फिरता—नभांत एकेक शब्द लिहितो मम पुस्तकांत

तरी अंतरीची तृप्ती नाही. छे ! कलावंत अहोरात्र आमरण अतृप्तच असावा. तृप्ती म्हणजे विकासाचा अंत. वाया जाणाऱ्या वयाची ज्याला खंत नाही तो कलावंत कसला ?

किती रहावे तुजाविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे
गेलें गेलें वय हें वाया ! मरणहि तें वाटे बरवे !

मनाजोगी कलाकृती हातून उतरल्यावाचून कलावंताच्या आत्म्याला शांती नाही.

पुष्पांनो तर दूर सरा, कंटक हो मार्गीं पसरा, प्रकाश नलगे, तिमिर बरा

शूल कपाली कंडन हृदयी, कंप शरीरी भरलासे

सलिल लोचनी, शीण अवयवी, हाय ! निराशा मनी वसे

कविते ! ती प्रीती आणि तूं. तुमच्या संगतीत मी रानोमाळ हिंडून फुले वेचिली ...गाणी गायिली.

दुर्दैवें तुज सोडुनि जरि दुरी लागे फिरावे मला

प्रीती आणिक तूं शिवाय न सुचे काही मना माझिया

'कांट्यावांचून गुलाब नसलेल्या' या जगांत—

स्पृहणीय असे काय जगीं एक असें ?

तर प्रीत.

—८— उत्कट प्रीतीच्या पोटी चित्शक्ती वसते मोठी
तिच्याच अंतरिच्या तेजे मत्प्रतिभेचा भाव सजे
प्राचिति न माझी जीवन-लहरींतील प्रीति बुडबुडा
तिच्याच उन्मेषात नटे ही मावळतीची कडा

अशी प्रीती ज्याला मिळाली तो म्हणेल—

दो हृदयांच्या संगमसमयीं कसल्या लौकिकरीति

........विसर तर क्षणीं व्यवहाराला विसर शहाणपणाला

त्याच प्रीतीच्या वियोगामुळे सध्या माझी जी अवस्था झालेली आहे ती केवळ तशाच जिवाला कळे. माझ्या मनाच्या देव्हाऱ्यात तिचे स्थान अढळ आहे. म्हणूनच—

उत्कंठा हृदयीं मनोज्ञ तव ती पाहीन मूर्ती कदा

वेडा पीरच जाहलो जिवलगे आहे वियोगामुळे

कधी वाटतं, हे जीवित आहे तरी काय !

आहे जीवित काय ? केवळ असे निःसार भासापरी

का ते एक 'स्वप्न' आहे ? नव्हे; क्षणात नाहीशा होणाऱ्या दिव्य भासाच्या घटकांची ती एक प्रदीर्घ मालिका आहे.

हा ! हा ! हे जर सर्व भास धरतां येतील माते, तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर !

कलावंताच्या चिंतनातून जुने आहे ते विरले पाहिजे. नवीनाचा ध्यास त्याला लागला पाहिजे.

जुने जाउं द्या मरणालागुनि जाळुनि किंवा पुरुनी टाका
प्राप्तकाल हा विशाल सुंदर सुंदर लेणी तयांत खोदा
निज नामें त्यांवरती नोंदा

हरीभाऊ जे कादंबरीतून लिहीत आहेत, आगरकर जे निबंधांतून व्यक्त करीत आहेत तेच मी कवितेतून सांगत आहे. पात्रे वेगळी, पेय एकच.

पुरुषार्थ नव्हे पडणे रखडत

ते पहा बांधावर एक झुडुप. त्यावरील ती इवलाली फुले वाऱ्यावर डोलत आहेत. किती आनंद होतो त्यांच्याकडे पहाताना !

बांधावरी झुडुप एक पुष्प तयावरी सुरेख
मनन करित उन्मन मी येथ ठाकलो

मनाच्या या उन्मनी अवस्थेत निरंत रहावेसे वाटते.

( शेजारच्या चाळीतील एक मुलगा मोठमोठ्याने इतिहास वाचतो..." बाजीरावाने एका हाताने तरवार चालवीत आणि दुसऱ्या हाताने हुरडा उडवीत शत्रूच्या सैन्याचा धुव्वा उडविला आणि मराठ्यांच्या भगवा ध्वज अटकेपार नेला.

अरे मुला ! तूं वाचीत आहेस तो पहिला बाजीराव.
त्या शूराने भगवा झेंडा हिंदुस्थानी नाचविला
निजराष्ट्राचे वैभव नेले एकसारखे बढतीला

पण दुसऱ्याने—

........नाच्ये पोरे नाचवुनी
दौलतजादा केला धिग् धिग् भटवंशी रे जन्मोनी

विद्यार्थी जीवनात अनेक विषयांचे सांगोपांग ज्ञान प्राप्त करून घेता येते. म्हणून मुला—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
०९७८८ दि: ...

एक एक जो नवा शब्द तूं शिकसी
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी

माझे हे उत्तेजनाचे दोन शब्द ऐक ! लहान आहेस तोपर्यंत ते तुला ऐकावेसे वाटतील. जे जे तुला साकार करावेसे वाटते ते ते तूं आपल्या मनाच्या ऐरणीवर ठेव आणि त्यावर--

दे ठोले जोंवरी असे.....
तप्त लाल लोखंड
येइल आकारास कसे ? झाल्यावर तें थंड

तुझे उद्यांचे दिवस सुखाचे जायला हवे असतील तर—

तर तरुणा रे ! मला वाटते ध्यानीं संतत अपुल्या जाण
घड्याळ जें हें अविरत वदतें आला क्षण !....गेला क्षण !

आता प्रतिभेला रसरंग आला. दृष्टीपुढे दिशा रंगण घेऊ लागल्या. नक्षत्रे आकाशपुष्पे भासूं लागली. शब्दांना तेज येत चालले. स्फूर्तीने प्रतिभेचा हात हातात घेतला. आता--

कांठोकांठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या
प्राशन करिता रंग जगाचे, क्षणोक्षणी ते बदलूं द्या
अमुच्या भालीं कटकट लिहिली सदैव वटवट करण्याची
म्हणेल जग आम्हांस मद्यपी पर्वा कसली मग याची ?

आकाशाच्या ह्या निळया सागरात एकदा कल्पनेची नौका झोकून दिली की हवी तेवढी विचार-मौक्तिके हाती लागतात. एकेक विचार नक्षत्रांच्या तेजाचा. त्या विचारांची पद्यपंक्ती—

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे
टेकुनि ती जनता—शीर्षावरि जग उलथुनिया देउ कसे

देव आणि दानव, हे मानवनिर्मित आहेत हे जगाला सांगत असताना कुणी आमची व्यक्तिगत व्यंगे उगाळीत बसतील, बसू देत.

छंद-फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळू द्या
कांटोकांठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या

पलीकडल्या अंगणातून मुलींचे गाणे ऐकू येते—

| | |
|---|---|
| दे टाळी ग...ऽ दे टाळी | एक सारखी |
| अशा सकाळी | घेता गिरकी |
| मंगळ वेळी | तोल आपुला सांभाळी |
| आनंदाला कवटाळी | चढता रंगण |
| नाचूं गाऊं | निळे नभांगण |
| जीव रंगवूं | भारुनि येइल खाली |
| नातर खंगु अकाली | दे टाळी ग ऽ दे टाळी ) |

ह्या मुलींना उद्याची काळजी नाही. कशाची खंत नाही. आली घटका सुखात कशी घालवावी हाच त्यांच्या निरागस जीवनातील प्रश्न. चुटकीसारखा सुटणारा. टाळीबरोबर ब्रह्मानंदी टाळी लावणारा. पण माझ्या कपाळी ते भाग्य नाही.

मागे एका मंदिराच्या मंडपात असाच एक टिपऱ्यांचा नाच पाहिला. स्त्री-पुरुषांचा संमिश्र नाच. एका हातात टिपरी नि दुसऱ्या हातात दोरी. टिपऱ्यांच्या तालावर पावलागणिक रंगणारे ते रंगण आणि गुंफला जाणारा तो गोफ. गीत आणि नृत्य यांची किती मनोज्ञ गुंफण ! भूतभविष्याच्या विस्मरणावाचून वर्तमान रंगत नाही, हेच खरं.

हर्षखेद ते मावळले, हास्य निमाले, अश्रु पळाले
कंटकशल्यें बोथटली, मखमालीची लव वठली
काही न दिसे दृष्टीला, प्रकाश गेला, तिमिर हरपला
काय म्हणावे या स्थितिला ? झपूर्झा ! गडे, झपूर्झा !

| | |
|---|---|
| –९– चढता गाण्याची तान | भंवतीचे नुरते भान |
| पिसापरी होउनी हलके | दिगंतात मन घे झोके |
| चिंतनात त्या स्पर्श न कुठला | प्रतिभेला वावडा |
| कुठल्याही रसरंगे रंगे | मावळतीची कडा |

ज्ञाताच्या कुंपणावरून जेव्हा हे चंचल मन विजेचा वेग घेऊन अज्ञेयांत उड्डाण

घेते, तेव्हा त्या अंधुक प्रकाशांत ज्या आकृती दिसतात, त्या गाऊ लागतात. त्या गीतांचे स्वर असेच असतात. लौकिक मनाला न रिझविणारे, पण अलौकिकाला स्वप्नसंगमी विलीन करणारे.

झपूर्झा ! गडे झपूर्झा ! धरा जरा निस्संगपणा, मारा फिरके....मारा गिरके.

नाचत गुंगत म्हणा, म्हणा ! झपूर्झा ! झपूर्झा

ह्या अवस्थेत फक्त संत आणि महाकवीच जाऊ शकतात. 'धूमकेतू आणि महाकवि.' दोघेही जगातील महाक्रांतीचे भविष्य सांगणारे.

निश्चिंत तुम्ही स्वयंप्रकाशी अप्रतिहत फिरता

( एक स्त्री रांगोळी घालीत आहे. ती पाहून–) हिला अशी 'रांगोळी घालतांना पाहून' चित्तवृत्ती प्रसन्न होतात. इतक्या रंगवल्लिका मी पाहिल्या, पण हा संस्कृति-संगम काही वेगळाच. ( दे टाळी गऽ दे टाळी गुणगुणते.) हिच्या कंठात काबुली द्राक्षं विरघळलेली दिसताहेत. रांगोळीतील आशयाशी किती एकरूप झालेली आहे ही ! हव्या त्या विषयाशी कलावंताचे मन रंगले की त्याची प्रतिभा अशीच रंगण घेते. मला तर इथे–

स्वर्ग धरेला चुंबायाला खाली लवला मजला गमला

असंच वाटतं आहे. धर्मार्थ–कामातील सफलता सूचविणारे हे स्वस्तिक, पावित्र्याची प्रतीके मानली गेलेली ही गोष्पदें आणि तुळस, पायरीपाशी श्रीहरी उभा असल्याचे सूचित करणारे हे चक्र. आर्ये ! देवता वाटतेस तूं या कलाकृतीसमोर उभी राहिलीस म्हणजे. तुझे माझे नाते असते, निदान स्नेह असता तर...पण नको ! परस्त्रीकडे तटस्थतेने पहावे ! तूं 'जा मार्गे अपुल्या' (जाते.)

साध्याही विषयांत आशय कवीं मोठा किती आढळे
नित्याच्या अवलोकने जन परी होती पहा आंधळे

आर्य संस्कृती स्त्रीकडे वेगळ्या भूमिकेतून पहायला शिकविते.

हें सौंदर्य तुझें बघून सुभगे आनंद होतो मला
वर्णाया कवनीं मला गवसला उत्कृष्ट हा मासला

कधी एखादा जाणकार वाचक विचारतो, 'कसे हो लिहिता तुम्ही ? वाचकांची वृत्ती इतकी तल्लीन करणाऱ्या इतक्या हृदयंगम शब्दपंक्ती तुम्हांला कशा हो जमतात ?'

शारदेने जो मंत्र दिला कानीं तसें लिहिले मी काव्य तिचे मानीं

सृष्टीतील रम्यतेत एक प्रकारची चित् शक्ती आहे. ती शक्तीच माझ्या काव्य-रचनेला गती देते.

जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणे मनांत मग होय सवेंचि जागे

सृष्टीशी समरस झालेले, फुलपाखरामागे लागलेले मन आतून गाऊ लागते. तरी पण

तिमिरीं आम्ही नित्य रखडणे  विवंचनातचि जिणें कंठणे

ही जाणीव होऊन मन प्रहर प्रहर, दिवस दिवस बेचैन होतं. आणि मग उदासीनता म्हणते—

अमुचा पेला दुःखांचा  डोळे मिटुनी प्यायाचा

रसिका ! मी वर्णिलेल्या अनुभवाला तूं खुशाल अमृत म्हण; पण राहवेना म्हणून, यातना साहवेना म्हणून मी गात आहे. नाही गायलो तर जगणार नाही म्हणून. कवितेचा हा छंद नसता तर —

मीहि कशाला येथ रहावे ? काय असे ज्या मी चिकटावे ?

पण कधी अशी एखादी घटका येते की 'मिटल्या जाग्या डोळ्यांपुढे' स्वप्नांची फुलपाखरे तरंगू लागतात. हाच पहा ना ? 'नैऋत्येकडला वारा.' माझ्या जन्मभूमीतील सारी दृश्ये डोळ्यापुढे उभी रहावीत इतका सुखावह वाटतो. तिथे आंबे, पोफळी, साग, नारळी इत्यादींची बने आहेत. तेथील पक्ष्यांच्या कूजितात गंधर्वांच्या ताना आहेत. माझा गाव ! तिथे बालपणी आईच्या डोळ्यात मी सात्त्विक नि मंगल प्रेमाचा स्वर्ग पाहिला. वडिलांच्या मांडीवर तिथे मला राज्य भोगल्याचा आनंद झाला. तिथे मला बंधूंचे आशीर्वाद मिळाले. असे ते अलौकिक दृश्य हा वारा माझ्या दृष्टीपुढे उभे करतो. ह्या उत्कट स्मृतीतून उफाळणाऱ्या कवितेपुढे मला कीर्तीचे विलोभन नाही. नीतीची बंधने उल्लंघून मी प्रीतीची आराधना करणार नाही. मला माहीत आहे—

प्रीती या जगतात कंटकयुता ही एक वल्ली असे
शूलारोपणयूप त्यावरिल ही कीर्तिध्वजा की दिसे

माझ्या जन्मभूमीजवळील सागराच्या कुशीत, त्या निसर्गरम्य वातावरणात

मला कायमची झोप मिळाली तर...... ! माझ्या या उदासीन जीवाला असं कधी कधी वाटतं...... उगाच वाटतं. तसं झालं मग वरचेवर ओलावणारे डोळे तरी कायमचे कोरडे होतील. ( शेजारच्या मुलाचे 'विद्या प्रशस्ती' चे पाठांतर ऐकू येते.

संपदा किती जीपुढे पडे शक्तिचे जिच्यावाचुनी नडे
कोण ती बरे ? सांगिजे खरे, सांगिजे खरे )

( पुढे होऊन ) थांब ! अडखळलास ? मी सांगतो अरे !

शारदा बरे ! शारदा बरे !

(मुलगा 'हा, हा, बरोबर' असे म्हणतो.)
तुझ्या गुरुजींनी शिकविलेली आणखी एखादी कविता म्हण पाहू !
विद्यार्थी : कोणती म्हणू ?
तुला हवी ती म्हण !

विद्यार्थीः- तुज जरी करिती काठीला लावुनिया पटखंड
तरि तुजामध्ये वसत असे या सामर्थ्य उदंड
भक्ति जिथे दिव्यत्व जिथे उत्सव जेथे फार
तेथें तेथें दिसे तुझा प्रोत्साहक आकार
म्हणून मानव चित्ताची उंचावर जी धाव
तीचे चिन्हच तूं, तुजला निशाण सार्थक नांव
मिळमिळीत ज्याची कविता न असे रंडागीत
खचित जडेलाचि त्या कविची तुझ्यावरी रे प्रीत

छान ! छान !
विद्यार्थी : ( आश्चर्यचकित होऊन ) म्हंजे ! ही तुमची कविता ?
होय मास्री. म्हणूनच मी ती पाठ म्हणू शकलो.
( विद्यार्थी जातो... जाताना गुणगुणतो, ' खचित जडेलचि त्या कविची तुझ्यावरी रे प्रीत... )
इतकेही करून नजरेपुढे शून्येच शून्ये. ह्या शून्यात गिरक्या घेणाऱ्या मनाला—

मागे पुढे न काही दिसे, संशयडोही नौका फसे

९१८३

आणि मग कुणीकडून आलो नि कुणीकडे जायचे याचा विसर पडतो. दूर दूर जावंसं वाटतं.

दूर कोठे एकला जाऊनिया   एकतारी आपली घेउनीया

या दुःखित जिवाला आराम पडावा म्हणून निघून जावे.

आजवेरी बहु मनोभंग झाले   बहुत आशांचे प्राण निघुनि गेले.

पण मन स्वच्छंदात दंग असल्यामुळे त्यांच्या दाह जाणवत नाही. कारण आम्ही गातो ते आतड्यातून.

हृदयातूनं न जे बोल   निघती, ते सगळे फोल

प्रतिभेचे तेज पिळवटलेल्या आतड्यांतून निघालेल्या शब्दांत सामावलेले असते. ती प्रतिभा—

ती अत्यद्भुत गूढ शक्ति सहसा संचारता अंतरीं   मुक्तात्मा गगनी उडे—

आणि मग—

पिंडी जाय विलोपुनी विसरुनी ब्रह्मांड हे सत्वर
शब्दब्रह्म उचंबळून मग जे दाही दिशा व्यापिते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९५५५२

अशी दैवी शक्ती ज्याच्यावर प्रसन्न आहे, त्याला हे जग तुच्छ वाटले तर त्यात काही विशेष नाही.

—१०— लंघुनि ज्ञाताची सृष्टी   अज्ञेया उकली दृष्टी
प्रतिभेचे माझ्या बोल   तोलितील क्षितिचा गोल
कल्पनेत मम अता न कुंपण   अन् पलिकडला कडा
चित्घन चपला तेजाळिल   मम मावळतीची कडा

'आम्ही कोण' याची आता जाणीव झाली. आम्ही देवाचे लाडके आहोत. प्रतिभेच्या जोरावर आम्ही या विश्वात कोठेही संचार करू शकतो. आम्हांवाचून हे जग शून्य होय. ते आम्ही—

शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे?
आम्हांला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे
आम्हांला वगळा विकेल कवडी-मोलावरी हें जिणें

दिवाळी आली. चोहीकडे मांगल्य विखुरले आहे. सृष्टी हिरवा शालू नेसली आहे. घरासमोरील अंगणे सारविली आहेत. त्यावर रांगोळ्या घातल्या आहेत. मुली माहेरी आलेल्या आहेत. मुले फटाके उडविण्यात दंग आहेत. दाही दिशांना सौभाग्यसोहळे चालले आहेत.

साध्याला विसरून लोक धरिती भक्ती कसे साधनी

हा आशय मनांत उभा राहतो. 'खा, प्या आणि स्वच्छंद आनंद लुटा' असं ही दिवाळी सांगते आहे. मीच– फक्त मीच–

काळोखाच्या जगामधे या, मृत आशांच्या चितावरुनिया
पिशाच्च माझे भटकत आहे

म्हणूनच मी म्हणतो—

खाणें आणि पिणें विनोद करणे गाणेंहि वा खेळणें
जैसें ज्यास रुचेल त्यापरि तुम्ही या उत्सवीं वागणें
मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी

माझ्या मनाच्या कौलारीवर आज कितीतरी वर्षे रात्रीच्या एकांतात नैराश्याचे घुबड घूत्कारत आहे.

जा निघ येथुनि मला रडूं दे !
शोकें माझे हृदय कढूं दे !

कवि–हृदय तरल हवे. वाढत्या प्रौढपणाबरोबर शैशवातील लालित्य त्याने टिकवायला हवे. त्याची जतन करणे मोठे कठीण काम आहे. मनाला विवंचनेच्या सुरकुत्या पडल्या कीं मनुष्य चिडखोर बनतो. ही पहा म्हातारी तरंगते आहे माझ्या डोळ्यासमोर—

मन्मनही लागे - तरंगू म्हातारी संगे

पण नेहमीच असं वय विसरून वागणं मला जमत नाही. चिंतेने काजळलेल्या मनाला निरागसतेने हसता येत नाही.

आता मला कवितेचे पुरेपूर वेड लागले.

जिनें मला वेडा केले तिच्यावरी ही फिर्याद
तिचेवरी गाणीं वेडी गायिली क्रमाया काळ
तरि तिलाच चित्तीं ध्याते. निद्रेविण रजनी जाते
आप्तवर्ग म्हणती, "याते— कुठली ही जडली ब्याद ?"

माझी कविता म्हणजे एक गोफण आहे.

स्वहृदय फाडुनि निजनखरी गोफण केली छान
कठिण शब्द या धोंडयानी करितो हाणाहाण.

अशी विचाराने उदात्त, भाषेने रांगडी, पण आतड्यांचा पीळ असलेली आहे. पण या उदात्त भावनेला संसारात कित्येकदा राम नाही असं वाटतं. अलौकिकाच्या स्वप्न-दर्शनात ती निरंतर दंग असते.

त्रिखंड हिंडुनि धुंडितसे न परि हरपले तें गवसे
चुकचुकल्यापरि, वाटे अंतरि, होउनि बावरि, निजश्रेय मी पाहतसे

अलीकडे वरचेवर स्वप्नात शारदेची मूर्ती येते नि सांगते — "कवे ! तुझी गीते एकून मी प्रसन्न झाले आहे.

तुझ्या दिव्यत्वापुढे जग भिकारी कासया ही खिन्नता ? दूर सारी

यमुनेच्या तीरावरील ते मयूरासन चोरांनी पळविले. आणि तो ताजमहाल अजून आपले प्रतिबिंब तिच्या अथांग निळ्या जलाशयात पहात आहे. तेव्हा तुझ्या-सारख्या शब्दसामर्थ्य असलेल्या जातिवंत कलावंतांनी निराश होण्याचे कारण नाही. अरे, छंदवेड्या जीवा ! कलावंतांनी आपल्या घटका पापण्यांच्या कुंचल्यांनी रंगवायच्या असतात.

माझ्या नेत्रामधुनि आसवें चलति.... आंसवे चलति

असे म्हणू नकोस. कविराजा ! तूं नव्या मनूंतील 'नवा शिपाई आहेस.' ह्या स्वप्नांनी माझ्यात आत्मविश्वास निर्माण केला आहे.

नव्या मनूतिल नव्या जगाचा शूर शिपाई मी आहे
कोण मला वठणीला आणूं शकतो ते मी पाहे
ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा
पूजितसे मी कवणाला ? तर मी पूजी अपुल्याला
अपुल्यामध्यें विश्व पाहुनी, पूजी मी विश्वाला

(दूरवरून सतारीचे बोल जवळ जवळ येत असल्यासारखे ऐकू येतात.)

ह्या सतारीच्या बोलांनी मला चित्शक्ती दिली.

धीरा पोटीं....असती मोठी फळें गोमटी

हे मला शिकविले. माझ्या विभूतीमत्वाची वलये दिगंतराला किनारीत गेली. प्रतिभेला जाग आणली. ज्योतिर्मय जाग...

ज्वालेने रमणीय एक ठिणगी माझ्याकडे धाडिली
ती मी आपुलिया उदात्त हृदयी सानंद हो स्थापिली

त्याच ज्वालेवर माझ्या प्रतिभेच्या काव्यपंक्ती तरळत आहेत. ती प्रतिभा आपल्या पंखावरून शारदेचा देव्हारा घेऊन चालली आहे. माझ्या उरी आता शब्दब्रह्म उचंबळले आहे. ब्रह्मांड 'मीं'त विलीन होत आहे. अशा स्थितीत जिने मला वेडा केले, आणि भोवतालच्या जगाचा विसर पडेल अशा स्थितीत ठेवले, तिचेच आभार मानणे उचित आहे. झाले ! माझे जीवितकार्य आता संपले. ( जाता जाता )

अमुचा पेला दुःखाचा डोळे मिटुनी प्यायाचा
पिता बुडाशी गाळ दिसे त्या अनुभव हे नांव असे
फेकुनि द्या तो जगावरी अमृत होउं तो कुणावरी

-११- विष-पेला ज्याच्या अधरी तो न कुणाला दंश करी
अंतर्मुख राहून सदा जीवनिच्या भोगी विपदा
कधीं कुणाशी संकल्पांचा करितो ना उलगडा
तमा न त्या प्रतिपदीं फाजळे मावळतीची कडा

कल्पकता माझी गाते—

( ही कविता कविवर्य केशवसुतांचे दर्शन घडविणारे कवि गातात. )

कवि कृष्णाचा पदन्यास हा वळण कलेचे ज्यास नवे
किनारीत प्रतिभेची क्षितिजे चित्घन चपला जेथ लवे
ज्ञाताच्या पलिकडे विरे जी श्रेय हरपले हुडकाया
त्या प्रतिभेची अजून माझ्या लोचनात लहरे छाया
ते ऋण इतरांपरि कवळित उरि, आलो कविच्या माथघरी
पदयात्री मी, भाविकतेविण काय दुजे माझ्या पदरी !
कुणी आणिली असेल येथे दह्या–दुधाची कासंडी
कोकणचा मी, मेवा माझा, ही पोह्याची पुरचुंडी
उलगडता ती दिसेल तुम्हा कृष्ण–सुदाम्याचे नाते
भावस्पर्शी नव उन्मेषी कल्पकता माझी गाते

REFBK-0015552
REFBK-0015552